**बृहन्मुंबई महानगरपालिका**
**माध्यमिक आरोग्य सेवा**
**सेठ ऐ.जे.बी. महानगरपालिका कान नाक घसा रुग्णालय**

**क्र. एच ओ /२३३९/ ई एन टी दि.१७.१२.२०२५**

# सूचना परिपत्रक

मा. अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प.उप.) क्र.अति.आयुक्त/प.उप./४८९८/डी दि.०३.११.२०२५ व अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) क्र.अति.आ./शहर/डी/२००१ दि.१८.११.२०२५ अन्वयेच्या मंजुरीनुसार माध्यमिक आरोग्य सेवा अंतर्गत सेठ ऐ.जे.बी. महानगरपालिका कान नाक घसा रुग्णालयाच्या आस्थापनेवरील **'प्रयोगशाळा सहाय्यक'** वेतनस्तर एम -१३, रु. २१७०० - ६९००० या सुधारीत वेतनश्रेणीतील पदासाठी महागरपालिकेच्या प्रमुख रुग्णालय, नायर दंत महाविद्यालय व सार्वजनिक आरोग्य खाते व प्र.वै.अ.(खा.प्र.मा.आ.से) व प्र.वै.अ.(वि.रु) यांच्या आस्थापनेवर प्रयोगशाळा परिचर पदावर काम करणा-या कर्मचा-यांकडून सोबतच्या विहीत नमुन्यानुसार, अर्ज मागविण्यात येत आहेत.

कर्मचाऱ्यांनी आपले अर्ज मराठीत सुवाच्य स्वहस्ताक्षरात लिहून आपआपल्या खाते/विभाग प्रमुखांमार्फत व सेवाभिलेखानुसार अर्जातील माहिती पडताळून आवक-जावक क्रमांकासह **प्रमूख वैद्यकीय अधिकारी, सेठ ऐ.जे.बी. महानगरपालिका कान नाक घसा रुग्णालय, प्रशासकीय कार्यालय, महर्षि दधीची मार्ग, फोर्ट, मुंबई-४००००१** येथे **दिनांक २२.१२.२०२५ पासून दिनांक ०९.०१.२०२६** या कलावधीत कार्यालयीन वेळेत पोहोचतील याची दक्षता घ्यावी. सदर कालावधीपूर्वी वा नंतर प्राप्त झालेले अर्ज तसेच कुरीयर, स्पीड पोस्ट व टपालाद्वारे पाठविलेले अर्ज, अपूर्ण किंवा विहित नमुन्यात न भरलेले अर्ज, कर्मचाऱ्यांची स्वाक्षरी नसलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत, याची संबंधितानी नोंद घ्यावी.

**पदाचा तपशील :-**

१) पदाचे नाव : **'प्रयोगशाळा सहाय्यक'**

२) वेतनश्रेणी (सुधारीत) : वेतनस्तर एम -१३, रु. २१७०० – ६९०००/-

३) रिक्त पदांची संख्या : ०१ पद (एकाकी पद)

४) गट : 'क'

(परिपत्रक क्र.एमबीसी /१२५९ दि.१३.०४.२००४ चा अधिनियम क्र.८ मधील कलम ३(१)(घ) नुसार 'एकाकी' पदास आरक्षण लागू नाही)

१. **<u>दिव्यांग पद सुनिश्चितीचा तक्ता</u>** (मंजूरी क्र.एचओ/पी/६६७४ दि.१०.०१.२०२२)

| संवर्ग | शारीरिक पात्रता | दिव्यांग प्रवर्ग | जबाबदऱ्या व कर्तव्य |
|---|---|---|---|
| प्रयोगशाळा सहाय्यक | a) S= Sitting ,-बसने<br>b) ST= Standing-उभे राहणे<br>c)W= walking (चालणे),<br>d) BN= Bending- वाकणे<br>e) MF= Manipulation by fingers- बोटांची हालचाल<br>f) RW= Reading & Writing- वाचणे व लिहीणे<br>g) SE= Seeing- बघणे.<br>h) H= Hearing-ऐकणे.<br>i) C = Communication- संवाद साधणे | a) D= Deaf (बहिरा),<br>HH= Hard of Hearing (पूर्णत:किंवा अंशत:बहिरा)<br>b) OA= One Arm (एक हात),<br>OL= One Leg (एक पाय),<br>BL= Both Leg( दोन पाय),<br>OAL= One arm and One leg (एक हात व एक पाय)<br>CP= Cerebral Palsy (मस्तिष्क पक्षाघात),<br>LC= Leprosy Cured (कुष्ठरोगमुक्त),<br>Dw= Dwarfism (वाढ खुंटणे ),<br>AAV= Acid Attack Victims (ॲसिड हल्ला बळी) ,<br>c) ID= Intellectual Disability (बौद्धिक दिव्यांगता)<br>SLD= Specific Learning Disability (विशिष्ठ शिक्षण घेण्यास असमर्थ)<br>MI= Mental Illness (मानसिक आजार)<br>d) MD= Multiple Disabilities involving (a) to (d) एकाधिक व्यक्तिमत्व विकास (अ) व (ब) अंतर्भूत | रक्त तपासणी अहवाल तयार करणे, सर्व रुग्णांची नोंद, नोंदवहीत ठेवणे तसेच रक्त चाचणी अहवालाची नोंद नोंदवहीत ठेवणे व परिरक्षित करणे. प्रयोगशाळा तंत्रज्ञाना दैनंदिन कामकाजात मदत करणे. प्रयोगशाळा सेवकांकडून प्रयोगशाळेची स्वच्छता ठेवणे, तेथे दैनंदिन वापरासाठी असलेल्या उपकरणाची निगा राखणे. रक्त चाचणी करण्यासाठी येणा-या रुग्णांची नोंद घेऊन त्यांची रक्त चाचणी करण्यासाठी पुढील कार्यवाही करणे तसेच ज्या चाचण्या लगेच करता येणे शक्य नाही अशा रुग्णांना त्यांना तारीख व वेळ देणे. तसेच महानगरपालिकेच्या वैद्यकीय सेवेशी सहाय्यकारी व इतर संबधीत कामे करणे, महानगरपालिकेच्या कार्यनियमावलीनुसार कामे करणे. |

<u>दिव्यांग उमेदवार सर्वसाधारणरित्या पदाकरिता देखील अर्ज करू शकतात. उपरोक्त नमूद शारिरीक पात्रता, दिव्यांग प्रकार, पदाची जबाबदारी विचारात घेऊन अर्ज सादर करणे आवश्यक आहे.</u>

२. **<u>'प्रयोगशाळा सहाय्यक' पदाची अर्हता</u>** : (मंजुरी क्र. एमपीएम/३/४७२ दि.०६.०५.२०१३ अन्वये)

**<u>अंतर्गत निवडीने</u>** :

प्रमुख रुग्णालय, नायर दंत महाविद्यालय व सार्वजनिक आरोग्य खाते व प्र.वै.अ.(खा.प्र.मा.आ.से) व प्र.वै.अ.(वि.रु) यांच्या आस्थापनेवर प्रयोगशाळा परिचर पदावर काम करणा-या कर्मचा- यांमधून अर्ज मागवून

१) उमेदवार मान्यता प्राप्त विद्यापिठाचा विज्ञान शाखेतील पदवी (B.Sc.) उत्तीर्ण असल्यास त्याची प्रयोगशाळा परिचर पदावर १ वर्षाची सेवा झालेली असावी

अन्यथा

प्रयोगशाळा परिचर या पदावर २ वर्षाची सेवा झालेली असावी

२) उमेदवारास खात्यातंर्गत घेण्यात येणा-या व्यवसाय चाचणी (Trade test) परीक्षेत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

३) उमेदवार (डी.ओ.ई.ए.सी.सी.) सोसायटीचे (सी.सी.सी.) किंवा (ओ स्तर) किंवा (ए स्तर) किंवा (बी स्तर) किंवा (सी स्तर) स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य आणि तांत्रिकी शिक्षण मंडळाचे एम.एस.आय.टी. किंवा

जी.ई.सी.टी. चे प्रमाणपत्र धारक असावा किंवा सदर प्रमाणपत्र सादर करण्यास सुट देण्याकरीता शासनाने वेळोवेळी संगणक हाताळणी/वापराबाबत मान्यता दिलेला अभ्यासक्रम दोन वर्षाच्या आत पूर्ण करणे आवश्यक.

४) उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र किंवा तत्सम किंवा उच्चतम परिक्षा ५० गुणीं प्रश्नपत्रिका असलेल मराठी विषय (उच्चस्तर/निम्नसतर) घेऊन उत्तीर्ण असावा.

टिप : उमेदवाराची नियुक्ती ६.११.०९ पूर्वी झाली असल्यास त्यास मराठी फक्त लिहिता, वाचत, बोलता येणे आवश्यक आहे.

३. **<u>प्रयोगशाळा सहाय्यक पदाचे निवडीचे निकष व कार्यपध्दती</u>**

- व्यवसाय चाचणी परिक्षा ही केवळ पात्रता परीक्षा असेल.
- प्रयोगशाळा सहाय्यक पदासाठी अर्ज केलेल्या उमेदवारास अर्हतेनुसार खात्यामार्फत घेण्यात येणाऱ्या व्यवसाय चाचणीत पात्र झाल्यास निवड यादी निवडसमिती समोर ठेवण्यात येईल. निवडसमिती व्यवसाय चाचणीत पात्र उमेदवाराचे गोपनीय अहवाल तपासून, चौकशी अहवाल ई कागदपत्राची छाननी करून परिपत्रक क्र.एमपीएम/०३/२७८१ दि.०७.०४.२०१० अन्वये दिलेल्या निर्देशानुसार आपापसातील सेवाजेष्ठतेनुसार व आपापसातील सेवाजेष्ठता ठरविताना त्यांच्या सेवाप्रवेशाच्या पदावरील सेवाजेष्ठता विचारात घेऊन कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतर अंतिम निवडयाडी तयार करण्यात येईल व निवड समितीने केलेला शिफारशीनुसार नियुक्तीकरिता विचार करण्यात येईल.
- पात्र कर्मचाऱ्यांची अंतिम निवड यादी तयार करताना दोन किंवा अधिक कर्मचाऱ्यांचा सेवाप्रवेशापदावरील नियमित नियुक्ती दिनांक समान असल्यास पुढील निकष लागू राहतील.
  अ) जन्म दिनांकानुसार वयोज्येष्ठ कर्मचाऱ्यास प्राधान्यक्रम देण्यात येईल.
  ब) जन्म दिनांक समान असल्यास कर्मचाऱ्याच्या आडनावाच्या आद्याक्षरानुसार प्राधान्यक्रम देण्यात येईल.

४. यापूर्वी आरक्षणाचा लाभ घेतलेल्या व आता घेणा-या मागासवर्गीय कर्मचा-यांनी त्यांच्या जातीच्या विहीत नमुन्यातील सक्षम प्राधिका-यांकडून प्राप्त केलेल्या जात प्रमाणपत्राची व जात वैधता प्रमाणपत्राची साक्षांकित छायांकीत प्रत अर्जासोबत जोडून सादर करणे आवश्यक आहे.

५. महानगरपालिकेच्या मागासवर्ग कक्षाचे परिपत्रक क्र. एमबीसी/६२५७ दि.२०.०१.२०२० अन्वये अधिसंख्य पदावर वर्ग केलेल्या अथवा वर्ग करण्याची कार्यवाही चालू असलेल्या कर्मचाऱ्यांचे तसेच मूळ नियुक्ती अ.ज. प्रवर्गातून झालेल्या मागासवर्गीय कर्मचाऱ्यांनी अद्याप अ.ज. वैधता प्रमाणपत्र सादर केले नसल्यास अथवा मूळ नियुक्ती अ.ज. प्रवर्गातून झाल्यानंतर वि.मा.प्र. अथवा अन्य कोणतेही मागासवर्गाचे जात प्रमाणपत्र सादर केलेल्या कर्मचाऱ्यांचे अर्ज विचारात घेतले जाणार नाही.

६. उमेदवारांकरिता विहित केलेल्या अटींची पूर्तता करणा-या सर्व उमेदवार (मागासवर्गीय उमेदवारांसह) सर्वसाधारण पदावरील शिफारशीकरिता विचार होत असल्याने सर्व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गातील पद आरक्षण/उपलब्ध नसले तरी अर्जामध्ये मूळ प्रवर्गा संदर्भातील माहिती अचूकपणे नमूद करणे आवश्यक आहे.

७. विवाहित महिला उमेदवारांनी विवाह नोंदणी प्रमाणपत्र,नावात बदल झाल्याबाबतचे राजपत्र सादर करावे तसेच ते नसल्यास विवाहित महिला विवाह पूर्वीच्या नावाने अर्ज करु शकतात.

८. अर्जदाराने आपल्या संबधीत कार्यालयामार्फत खातेप्रमुखाच्या शिफारशीसह सेवाअभिलेखानुसार पडताळणी केलेले प्रपत्र-ब (०२ प्रती), खातेप्रमुखाच्या स्वाक्षरीचे चौकशी प्रमाणपत्र सेवाअभिलेखावरून व सॅप प्रणालीतील चौकशी प्रमाणपत्र,मागील ०५ वर्षाचे गोपनीय अहवाल, कर्मचारी मागासवर्गीय असल्यास जात प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र, लगतेच नोन क्रिमिलेयर प्रमाणपत्र, वेतन पावती, महानगरपालिका ओळखपत्र, महानगरपालिकेतील प्रथम नियुक्ती आदेश, विवाहित महिलांच्या नावात बदल असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र व नावात बदल झाल्याबाबतचे महाराष्ट्र शासनाचे राजपत्र ई. कागदपत्रे अर्जा सोबत जोडणे आवश्यक आहे. मराठी लिहिता वाचता येणेबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच अर्जदार २००९ नंतर सेवेत रुजू झाले असल्यास माध्यमिक शालांत प्रमाणपत्र, इत्यादी १० वी उतीर्ण गुणपत्रिका व प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

९. सर्व प्रमाणपत्रांच्या मूळ प्रती पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे, अन्यथा उमेदवार व्यवसाय चाचणी व निवडीकरिता पात्र समजला जाणार नाही, याची अर्जदारांनी नोंद घ्यावी. पडताळणीवेळी कर्मचारी उपस्थित न राहिल्यास निवडीकरिता पदासाठी इच्छुक नाही असे समजण्यात येईल. सदर प्रकरणी कोणताही पत्रव्यवहार स्विकारला जाणार नाही ही जबाबदारी सर्वस्वी उमेदवाराची असेल याची नोंद घ्यावी.

१०. परिपत्रक क्र.एमपीएम/२/३२२१ दि.१४.११.२०१४ अन्वये ‘ड‘ गटातील कर्मचारी ‘क‘ गटात अंतर्भूत झालेल्या पदांवर पदोन्नत झाल्यास त्यांनी नियुक्ती दिनांकापासून दोन वर्षाच्या आत संगणक परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे अन्यथा त्यास मूळ पदावर पदावनत करण्यात येईल.

११. निवड झालेल्या कर्मचाऱ्याविरुद्ध चौकशी प्रस्तावित किंवा प्रलंबित असल्यास किंवा कर्मचारी शिक्षाधीन असल्यास अशा कर्मचाऱ्याचा सदर पदावरील नियुक्तीसाठी विचार केला जाणार नाही.

१२. ‘प्रयोगशाळा सहाय्यक' या पदावर निवड झाल्यानंतर निवड झालेल्या कर्मचा-याने सदर पदावरुन मुळ पदावर येण्याबाबत अर्ज दोन वर्षाच्या आत सादर करणे बंधनकारक असेल. दोन वर्षाच्या कालावधीनंतर त्यांचा मुळ पदावरील धारणाधिकार रद्द होईल.

१३. उमेदवारांस प्रमाणपत्र पडताळणीसाठी उपस्थित राहण्याचे ठिकाण:-

| **ठिकाण** | **तारिख व वेळ** |
|---|---|
| प्रमुख वैद्यकीय अधिकारी,<br>सेठ ऐ.जे.बी. महानगरपालिका कान, नाक, घसा रूग्णालय,<br>७, महर्षी दधीची मार्ग, फोर्ट, मुंबई- ४००००1 | दि. १९.०१.२०२६<br>वेळ: सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० वाजे पर्यंत |

१४ .उमेदवारांना व्यवसाय चाचणी साठी स्वखर्चाने हजर रहावे लागेल.

१५. व्यवसाय चाचणी यासाठीची वेळ, दिनांक व स्थळ हे नंतर जाहीर करण्यात येईल.

१६. परिपत्रक क्र.एमपीएम/९५३५ दि.२०.०६.२००१ अन्वये सदर भरती प्रक्रियेअंतर्गत प्रयोगशाळा सहाय्यक पदाकरिता पात्र ठरलेल्या कर्मचा-यांच्या कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतर रिक्त पदांइतकीच अंतिम निवडयादी तयार करण्यात येईल. तथापि भरती प्रक्रियेअंतर्गत कर्मचारी नियुक्तीकरिता इच्छुक नसल्यास किंवा काही करणातस्व पदभार स्विकारला नाही किंवा कर्मचा-यास प्रत्यावर्तित केले किंवा अन्य कारणास्तव पद भरले गेले नाही तरच प्रतिक्षा यादीतील कर्मचाऱ्याचा नियुक्तीसाठी विचार करण्यात येईल. अंतिम निवडयादी/प्रतिक्षायादीची विधिग्राहयता दोन वर्षासाठी राहील, त्यानंतर निवडयादी/प्रतिक्षायादी व्यपगत होईल.

१७. प्रस्तुत भरती प्रक्रियेअंतर्गत प्राप्त होणारे अर्ज याच भरती प्रक्रियेसाठी विचारात घेतले जातील. नव्याने रिक्त होणाऱ्या पदांसाठी सदर भरती प्रक्रियेअंतर्गत तयार केलेल्या प्रतिक्षा यादीतील कर्मचाऱ्यांचा विचार केला जाणार नाही.

१८. उपरोक्त भरती प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचे अधिकार प्रशासन राखुन ठेवत आहे.

सर्व खाते/विभाग आस्थापना प्रमुख यांनी हे परिपत्रक त्यांच्या कार्यालयातील सूचना फलकावर लावून तसेच संवर्ग प्रसारित करून त्यास मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी द्यावी.

**सही/-**
**प्रमुख वैद्यकीय अधिकारी**
**सेठ ऐ.जे.बी. महानगरपालिका कान नाक घसा रुग्णालय**

**क्र.एच ओ/ २३३९/ई एन टी दि.१७.१२.२०२५**

प्रत : ........................................................................ यांना माहितीकरिता व योग्य त्या कार्यवाही करिता.

**सही/-**
**प्रमुख वैद्यकीय अधिकारी**
**सेठ ऐ.जे.बी. महानगरपालिका कान नाक घसा रुग्णालय**